MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co.Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)
(CIN No. U40109MH2005SGC153646)

## जाहिरात क्र. ०७/२०२३, जाहिरात क्र. ०९/२०२३ व जाहिरात क्र. ०१/२०२४ करीताचे शुध्दीपत्रक

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये अनुक्रमे जाहिरात क्र. ०७/२०२३ दि. ०४.१०.२०२३ अन्वये सहाय्यक अभियंता (पारेषण) सरळसेवा भरतीअंतर्गत, जाहिरात क्र.०१/२०२४ दि. १९.०१.२०२४ अन्वये सहाय्यक अभियंता (पारेषण) अंतर्गत अधिसूचनेद्वारे व जाहिरात क्र. ०९/२०२३ दि. २०.११.२०२३ अन्वये विद्युत सहाय्यक (पारेषण) (कंत्राटी) सरळसेवे अंतर्गत या पदांची रिक्तपदे भरण्याकरीता जाहिराती कंपनीच्या संकेतस्थळावर जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. तसेच, याबाबत विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली होती.

सदर जाहिरातींच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्जाची नोंदणी करण्याकरीता वेबलिंक (URL) कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली होती. जाहिरातीतील नमुद वेळापत्रकानुसार अर्ज करण्याची अंतीम तारिख दि.२४.१०.२०२३, दि. १०.१२.२०२३ व दि. १९.०२.२०२४ होती. त्या अनुषंगाने, उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले परंतु सदर पदांकरीता ऑनलाईन परिक्षा झालेली नसल्यामुळे भरती प्रक्रिया सुरु झालेली नाही.

दरम्यान, शासन निर्णय दि. २७.०२.२०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक मागास वर्गाकरीता आरक्षणाची तरतुद लागू करण्यात येणार असल्यामुळे सदरच्या जाहिरातीमध्ये दिलेली आरक्षण वर्गवारी सद्यस्थितीत मागे घेण्यात येत आहे. नवीन सुधारीत बिंदूनामावलीप्रमाणे प्रवर्गनिहाय रिक्त पदांची माहिती प्रसिद्ध करण्यात येईल व उमेदवारांना अर्ज करण्यासाठी पुरेसा अवधी देण्यात येईल. तसेच सदर भरती प्रक्रिया मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र.३४६८/२०२४ व इतर याचिकाबाबत मा.न्यायालयाचा आदेशाच्या अधीन राहून करण्यात येईल. ज्या उमेदवारांनी यापूर्वी अर्ज भरले आहेत त्यांनी पुनश्चः अर्ज भरण्याची आवश्यकता राहणार नाही. सुधारीत रिक्तपदे, URL Link इ बाबतचे प्रसिद्धीपत्रक लवकरच कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. उक्त पदाकरीता मूळ जाहिरातीमध्ये नमूद केलेले शैक्षणिक अर्हता, अटी व शर्ती इत्यादी अबाधित राहतील.

सही /-

दिनांक : २८.०५.२०२४

मुख्य महाव्यवस्थापक (मासं)